## - प्रकरण सहावे -

## सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड सांगली निष्कर्ष व उपाय योजना.

## प्रकरण ६ वे

## निष्कर्ष व उपाय योजना

नागरी सहकारी बँकांच्या अभ्यासावरून असे दिसून येते की, बँकिंग क्षेत्रात व्यापारी व राष्ट्रीकृत बँकांप्रमाणेच नागरी सहकारी बँकांनाही बरेच महत्व प्राप्त झालेले आहे. नागरी बँका आता प्रगती पथावर आहेत. नागरी बँकांकडे ठेवींचा ओघ सतत वाढत आहे. याची प्रमुख कारणे म्हणजे जलद सेवा, व्यापारी बँकांपेक्षा ठेवींवर देण्यात येणारा एक टक्का जादा व्याजदर, रूपये १,००,०००/- पर्यन्तच्या ठेवीस विमा संरक्षण, आर्थिक स्थैर्य व अत्यंत सुयोग्य व्यवस्थापन हे होय. विशेषत: छोटे व्यापारी, लघुउद्योग, व्यवसायिक, छोटे तंत्रज्ञ कारागीर, छोटे वितरक, शहरी विभागातील नोकरदार पगारदार व समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना अर्थसहाय्य करणा-या बँका म्हणून भारतातही नागरी सहकारी बँकांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या नागरी सहकारी बँकांची कार्यपध्दती कशाप्रकारे चालते याचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक शिक्षक बँकेची निवड केली आहे. या अभ्यासाची मांडणी पूर्वीच्या प्रकरणा द्वारे झाली आहे. त्या प्रकरणांचा घोषवारा हा अहवाल लेखनाचा महत्वाचा भाग असून अभ्यासाद्वारे काढलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१) जगात सहकारी चळवळीची सुरूवात प्रथम इंग्लंडमध्ये १८४४ मध्ये औद्योगिक क्रांतीतून झाली. सन १८५५ ते १९८५ च्या दरम्यान जर्मनीमध्ये "हर्मन शुल्टझ" व इटलीमध्ये "लुइगी लुझाटी" यांनी काही नागरी सहकारी पतसंस्था सुरू केल्या. नंतर हळूहळू ही चळवळ सर्व जगभर पसरत गेली.

२) भारताच्या बाबतीत हा विचार केल्यास असे आढळते की, इ.स.१९८९ हे वर्ष नागरी सहकारी बँकांच्या स्थापनेचे शताब्दी संवत्सर आहे. नागरी सहकारी बँकांच्या शंभर वर्षाच्या वाटचालीची सुरूवात बडोदा येथे १८८९

मध्ये "अनोन्य सहकारी मंडळी" सहकारी बँकेच्या स्थापनेने झाली. आणि देशात या चळवळीने आपले एक वेगळे स्थान निर्माण केले तरी खऱ्या अर्थाने भारतात नागरी सहकारी पतपुरवठा चळवळीचा विकास १९०४ मध्ये सहकारी कायद्यानंतर झाली.

३) भारतात मोठ्या प्राथमिक सहकारी बँका १६० आहेत. शाखा संख्या १,३४० इतकी आहे. या बँकांचे वसुल भाग भांडवल १५७,०८ लाख रुपये आहे. ठेवी ५.४४७.८२ लाख रुपये खेळते भांडवल ६,९००.३४ रुपये आहे. व कर्जे ३,९५२.८८ रुपये आहे.

१६० मोठ्या बँकांपैकी जास्त महाराष्ट्र आणि गुजरात मधीलच आहेत. त्यांचे प्रमाण ८०% इतके आहे. अन्य राज्यातील बँकांचे प्रमाण अत्यल्प आहे. १९९० अखेर प्राथमिक सहकारी बँकांची संख्या ४९.४६ टक्क्यांनी, सभासद संख्या १८५८.४६% नी ठेवी ४३,३००.४० % नी आणि कर्जे २४,३४३.६३% नी वाढली. या वाढी लक्षणीय आहेत.

४) महाराष्ट्रात नागरी सहकारी बँकांचे जाळे पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात आहे. एकंदर ३६९ बँकांपैकी ३२१ बँका पश्चिम महाराष्ट्रात होत्या. उर्वरित ४८ बँकांपैकी मराठवाड्यात १६ आणि विदर्भात ३२ बँका होत्या. याचा अर्थ मराठवाड्यात आणि विदर्भात नागरी बँकांची चळवळ फोफावली नाही. पश्चिम महाराष्ट्रात देखील या चळवळीचे केंद्रीकरण बृहन्मुंबई, पुणे, नाशिक, सांगली, ठाणे, सोलापूर या जिल्ह्यात अधिक आहे. राज्यात गडचिरोली आणि चंद्रपूर या दोन जिल्ह्यांत एकही नागरी बँक नाही. ३० जून,१९९० अखेर महाराष्ट्रात ३८५ नागरी सहकारी बँका होत्या. यापैकी २३ महिला सहकारी बँका होत्या. सर्वाधिक महिला सहकारी बँक असणारे महाराष्ट्र हे राज्य आहे.

१९८९ मध्ये महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँका ४२.२६% नी वाढल्या सभासद संख्या ३०७.७०%, भाग भांडवल १,३०२.२५% ठेवी ४,७४४.८५% नी तर कर्जे ४,०९९.२१% नी वाढल्या. १९८९ अखेर महाराष्ट्रात १० मोठ्या बँका होत्या.

५) सांगली जिल्ह्यात एकूण नागरी सहकारी बँका २३ आहेत. या बँकांची सभासद संख्या १९९३-९४ मध्ये १,८६,३०५ अशी आहे. तर भाग भांडवल ८७६७३ हजार, गुंतवणूक १५७४२४ हजार, ठेवी ४३३००२० हजार, कर्जे २९९६०९३ हजार व नफा ३५३५५८१४ एवढा आहे. सांगली जिल्ह्यातील सहकारी बँकांची चळवळ यशस्वी होत आहे. बँकांच्या संख्येत व परिस्थितीत सुधारणा होत आहे.

६) आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीने भांडवल हा घटक प्रभावी ठरतो. १९८१ मध्ये प्राथमिक शिक्षक बँकेचे भाग भांडवल ७५ लाख रुपये होते. त्यामध्ये वाढ होऊन १९९४ मध्ये बँकेचे अधिकृत भाग भांडवल २ कोटी रुपये इतके झाले आहे. बँकेच्या अधिकृत भाग भांडवलातील प्रगती ही उल्लेखनिय आहे.

७) प्राथमिक शिक्षक बँकेच्या मालकीच्या भांडवलात सुध्दा वाढ झाल्याचे दिसून येते. १९८१ मध्ये मालकीचे भांडवल ६८.२० लाख रुपये होते. त्यामध्ये वाढ होऊन १९९४ मध्ये १५१.४५ लाख रुपये इतके झाले आहे. १९८१ मध्ये मालकीच्या भांडवलातील सरासरी वार्षिक वाढ ०.७५ लाख रुपये होती. त्यामध्ये वाढ होऊन १९९४ मध्ये सरासरी वार्षिक वाढ १.२२ लाख रुपये इतकी झाली आहे.

८) मालकीच्या भांडवलाबरोबरच बँकेच्या खेळत्या भांडवलातही वाढ झाली आहे. १९८१ मध्ये खेळते भांडवल २२८.८५ लाख रुपये होते. त्यामध्ये वाढ होऊन १९९४ मध्ये २७७३.४३ लाख रुपये इतकी उल्लेखनिय वाढ झाली आहे. प्राथमिक शिक्षक सभासदांकडून मासिक वर्गणी फी रुपये ५०/- इतकी घेतली जाते. त्यामुळे आपोआपच खेळत्या भांडवलात वाढ होते.

९) जे प्राथमिक शिक्षक आहेत, अशा सर्वांना शिक्षक बँकेचे सभासदत्व मिळते. याशिवाय मान्यताप्राप्त खाजगी शाळा असतील तर त्यांनाही सभासदत्व दिले जाते. बँकेच्या अलीकडील १४ वर्षाच्या कालावधीत सभासद संख्येत

वाढ होत आहे. १९८१ मध्ये कायम सभासद ७१४८ इतके होते व नाममात्र सभासद ६१ होते. यामध्ये वाढ होऊन १९९४ मध्ये कायम सभासद ७९०५ व नाममात्र सभासद संख्या ३३० इतकी झाली आहे. सभासदांच्या संख्येत विशेष वाढ होताना दिसते आहे.

१०) नागरी सहकारी बँका ठेवी गोळा करतात व त्यामधून सभासदांना कर्जे देतात. ही कर्जे बँका मुदती कर्जे, कॅश क्रेडिट, अधिकर्ष सवलत त्यांच्या सभासदांना देतात. आणि अशी कर्जे गरजू व्यापारी छोटे कारखानदार, नोकरदार आणि छोटे कारागीर यांना देण्यात येतात. प्राथमिक शिक्षक बँक आपल्या सभासदांन अल्प, मध्यम व दिर्घ मुदतीची कर्जे देत आहे. ही कर्जे देत असताना पगार व इतर किंमती वस्तू तारण घेतल्या जातात. १९८१ मध्ये अल्प, मध्यम व मुदतीची कर्जे मिळून ९७९.०५ लाख रुपये इतकी कर्जे दिली होती. त्यामध्ये वाढ होऊन १९९४ मध्ये अल्प मध्यम व दिर्घ मुदतीची मिळून २०४५.४७ लाख रुपये इतकी कर्जे दिली आहेत.

१९८१ मधील कर्जपुरवठ्यातील सरासरी वार्षिक वाढ १५.१६ लाख रुपये होती. तर १९९४ मध्ये कर्ज पुरवठ्यातील सरासरी वार्षिक वाढ २५८.२५ लाख रुपये इतकी आहे. या बँकेत विनातारणी कर्जे दिली जात नाहीत.

११) प्राथमिक शिक्षक बँक, सांगली या बँकेच्या कर्जवाटपाच्या अभ्यासावरून असे दिसून येते की, जे प्राथमिक शिक्षक सभासद आहे, अशा सर्वांना कर्जपुरवठा केला जातो. कर्ज देत असताना जात, धर्म, पंथ यांचा विचार केला जात नाही. जे गरजू सभासद आहेत. त्यांची गरज तातडीने भागविली जाते.

१२) इतर बँकांप्रमाणेच प्राथमिक शिक्षक बँक ही ठेवी स्विकारते. ठेवीमध्ये चालू ठेवी मुदत ठेवी व बचत ठेवी स्वीकारते. ठेवींच्या प्रमाणात बँकांची प्रतिमा उज्वल होत असते. या बँकेत प्राथमिक शिक्षक सभासदांशिवाय अन्य लोकांना

ठेवी ठेवता येतात. प्राथमिक शिक्षक बँकेने १९८१ मध्ये ८८.६१ लाख रुपये ठेवी ठेवल्या होत्या. त्यामध्ये वाढ होऊन १९९४ मध्ये ११९६.२७ लाख रुपये इतक्या ठेवी ठेऊन घेतल्या आहेत.

१३) यामध्ये १९८१ मध्ये चालू ठेवी व मुदत ठेवीचा वाटा ७५.४४ लाख रुपये होता. व बचत ठेवीचा वाटा १३.१७ लाख रुपये होता. १९९४ मध्ये चालू व मुदत ठेवीचा वाटा १६३७.०४ लाख रुपये आहे व बचत ठेवीचा वाटा २७९.२३ लाख रुपये आहे. यावरून बँकेच्या एकूण ठेवीमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते आहे.

१४) या प्राथमिक शिक्षक बँकेत ठेव विमा योजना सुरू केली आहे. या योजने अंतर्गत सभासदांना रुपये १,००,०००/- पर्यन्तच्या ठेवींना संरक्षण दिले जाते. यामुळे ठेवींना संरक्षण मिळाल्यामुळे या बँकेच्या ठेवी वाढत आहेत.

१५) नागरी सहकारी बँकांना गुंतवणूक करीत असताना रोखता लाभता व सुरक्षितता या तत्वांचा विचार करावा लागतो. प्राथमिक शिक्षक बँकेने १९८१ मध्ये २७.३९ लाख, रुपये इतकी गुंतवणूक केली आहे. १९८१ मधील गुंतवणूकीतील सरासरी वार्षिक वाढ ०.८४ होती. तर १९९४ मधील १३६.२३ लाख रुपये इतकी आहे.

थोडक्यात - यावरून बँकेची आर्थिक स्थिती भक्कम असल्याचे दिसून येते.

१६) नागरी सहकारी बँका ठेवी गोळा करतात. या जमलेल्या ठेवीतून कर्ज देतात नफा मिळवतात. हेच बँकेचे उत्पन्न असते. प्राथमिक शिक्षक बँकेच्या उत्पन्नात वाढ होताना दिसते आहे. १९८१ मध्ये एकूण उत्पन्न २६.१७ लाख रुपये होते. त्यामध्ये वाढ होऊन १९९४ मध्ये ३७६.२६ लाख रुपये इतके झाले. १९८१ उत्पन्नातील सरासरी वार्षिक वाढ ५.२९ लाख व टक्के वाढ २५.३४ एवढी होती. ती १९९४ मध्ये उत्पन्नातील सरासरी वार्षिक वाढ १४.८४ लाख रुपये व टक्के वाढ ४.११ इतकी झाली आहे.

१७) नागरी सहकारी बँकांना ज्याप्रमाणे उत्पन्न मिळते, त्याचप्रमाणे बँकेला काही खर्चही करावा लागतो. प्राथमिक शिक्षक बँकेचा खर्चही वाढत चालला आहे. खर्चात ठेवीदारांना दिलेले व्याज, नोकरपगार, विज, कर विमा, टपाल, तार, टेलिफोन, ऑडिट फी, स्टेशनरी, जाहिरात, छपाई, संचालक भत्ते यांचा समावेश होतो.

१९८१ मध्ये प्राथमिक शिक्षक बँकेचा खर्च २१.४७ लाख रुपये होता. त्यामध्ये वाढ होऊन १९९४ मध्ये ३६८.१९ लाख रुपये इतका झाला आहे. यावरुन प्राथमिक शिक्षक बँकेचा खर्च वाढत असल्याचे दिसून येते.

१८) वाढती थकबाकी ही बँकेच्या प्रगतीत अडथळा आणणारी बाब आहे. थकबाकी हे बँकांच्या प्रगतीमधील दुष्टचक्र आहे. प्राथमिक शिक्षक बँकेची थकबाकी वाढत असल्याचे दिसते. १९८१ मध्ये थकबाकीचे प्रमाण १.५५ लाख रुपये होते. त्यामध्ये वाढ होऊन १९९४ मध्ये १३.०६ इतके झाले आहे. ही थकबाकी वाढत असली तरी इतर बँकांप्रमाणे मोठ्या प्रमाणात नाही. कारण कर्ज ही पगार तारणावर दिली असल्यामुळे वसुली ही आपोआपच पगारातून होत असते.

१९) बँक हा देखील एक व्यवसाय आहे. व्यवसायाचा मुख्य हेतू नफा मिळविणे हा असतो. प्राथमिक शिक्षक बँकेच्या नफ्यात वाढ होत असल्याचे दिसते. आहे. १९८१ मध्ये ३.१४ लाख रुपये इतका होता. त्यामध्ये वाढ होऊन १९९४ मध्ये ८.१७ लाख रुपये इतका झाला आहे. तरीसुध्दा या प्राथमिक शिक्षक बँकेचा नफा हा हेतू नसून सेवा हा हेतू आहे. त्यामुळेच मिळणारा नफा हा प्रमाणात आहे.

२०) बँक हा एक व्यवसायच असल्याने येथे अनेक लोक काम करीत असतात. प्राथमिक शिक्षक बँकेत एकूण ९४ कर्मचारी काम करीत आहेत. हे सर्व कर्मचारी हुशार, कर्तबगार, अनुभवी असल्याने त्यांच्या बँकेच्या प्रगतीस

हातभार लागतो आहे. त्यांचा प्रेमळ स्वभाव कामातील सचोटी, आपुलकीचे संबंध, जिव्हाळ्याचे संबंध, असल्याचे दिसून येते. शिवाय बँकेनेही सेवक हा केंद्र बिंदू मानून जास्तीत जास्त सोयी त्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत.

२१) अधिकयात सहभाग हे सहकाराच्या प्रमुख तत्वापैकी एक आहे. प्राथमिक शिक्षक बँकेने १९८१ मध्ये ३.५ टक्के एवढा लाभांश वाटला होता. तर १९९४ मध्ये तो ४.० टक्के दराने वाटला आहे. या बँकेचा लाभांश ३ ते ५ % दरम्यानच वाटला जातो.

२२) लाभांश देण्याच्या योजनेबरोबरच या बँकेत रिबेट देण्याची योजना आहे. लाभांशापूर्वी रिबेटची रक्कम सभासदांना वाटली जाते. परिणामी लाभांश रूपाने कमी रक्कम वाटली जाते. १९८१ मध्ये २०% रिबेट वाटप केले आहे. हे प्रमाण नफ्यातील प्रमाणावर अवलंबून असते.

२३) प्राथमिक शिक्षक बँकेला १९८१ ते १९९४ या कालावधीत नेहमी "अ" ऑडिट वर्ग मिळाला आहे. यावरून असे दिसून येते की, बँकेचा कारभार अतिशय दक्ष आहे.

२४) त्याप्रमाणे फांदीशिवाय वृक्षाची वाढ अशक्य, त्याचप्रमाणे शाखाविस्तारा शिवाय बँकेची वाढ अशक्य. या बँकेने आजअखेर १४ शाखा उघडल्या आहेत व आणखी भिलवडी, भवानीनगर, सावळज, कोकरुड, खानापूर, संख; ढालगांव अशा आठ शाखांचे प्रपोजल रिझर्व्ह बँकेकडे पाठवून दिले आहे.

२५) सदर अभ्यासासाठी प्राथमिक शिक्षक बँकेच्या सद्य:स्थितीबाबत बँकेचे व्यवस्थापक व संचालक मंडळाची प्रश्नावलीच्या सहाय्याने माहिती घेण्यात आली आहे. सर्व प्रश्नांची उत्तरे बँकेचे संचालक मंडळ, चेअरमन, मॅनेजर - एम.के. पाटील, शाखा विस्तार अधिकारी - घोरपडे, लोकल ऑडिटर - चव्हाणे, सहकारी ऑडिटर - तांबोळी यांनी सर्व प्रश्नांची उत्तरे देऊन

सहकार्य केले आहे.

२६) बँकेची थकबाकी वाढत असल्याचे एकंदर चर्चेतून आढळते. याचे महत्वाचे कारण म्हणजे कर्जे कोणत्या कारणासाठी घेतली, त्याच कारणासाठी वापरली जात नाहीत. तसेच येणे कर्जात वाढ, कर्ज अर्जाची छाननी काळजीपूर्वक केली जात नाही. असे आढळून येते. असे असले तरी इतर बँकाप्रमाणेच या बँकेचे थकबाकी फार रहात असलेली दिसून येत नाही.

२७) बँक ज्याप्रमाणे उत्पन्न मिळविते. त्याचप्रमाणे बँकेला खर्चही करावा लागतो. या बँकेच्या कार्यातून बँकेला नफा मिळतो. प्राथमिक शिक्षक बँकेचा नफा मिळविणे हा हेतू नसून शिक्षकांची सेवा करणे हा हेतू असल्यामुळे नफा प्रमाणात शिल्लक रहातो, तो अवास्तव रहात नाही.

२८) बँकेच्या कार्यक्षेत्रातील वाढीमुळे आणि त्यामुळे सेवकांच्या संख्येत पगारात झालेल्या वाढीमुळे बँकेच्या प्रशासकीय खर्चात वाढ झाल्याचे एकंदर अभ्यासा वरुन आढळते.

२९) प्राथमिक शिक्षक बँकेच्या व्यवस्थापक व संचालक मंडळाची मुलाखत घेतली. तेव्हा त्यांनी सांगितले की, या प्राथमिक शिक्षक बँकेच्या निमित्ताने सेवा करण्याची संधी मिळाली. समाजाची काय अवस्था आहे, याचे चित्र जवळून पहायला मिळाले. सहकारी क्षेत्रात काम केल्यामुळे सहकाराचे शिक्षण मिळाले.

३०) बँकेची प्रगती समाधानकारक होण्यामध्ये अनुभवी संचालक मंडळ, कुशल व कार्यक्षम कर्मचारी वर्ग, लोकांच्या मनात बँकेबद्दल असलेली अपुलकीची व सहकार्याची भावना इत्यादी प्रमुख कारणे आढळतात.

३१) प्राथमिक शिक्षक बँकेत दर ५ वर्षांनी संचालक मंडळाची निवड केली जाते. संचालक मंडळात एक चेअरमन एक व्हाईस चेअरमन व १५ संचालक व एक

डी·सी·सी· बँक प्रतिनिधी अशा एकूण १८ लोकांची निवड केली जाते. संचालक मंडळ जास्तीत जास्त वेळ देऊन बँकेची सेवा करण्याचा प्रयत्न करतात.

३२) बँकेची गुंतवणूक ही रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार केली जाते. रिझर्व्ह बँकेच्या धोरणाप्रमाणे प्रत्येक बँकेस त्यांच्या एकूण टाईम डीमांड लँबिलीटीच्या २५ टक्के लिक्वीड असेट्स ठेवावे लागतात. तसेच ठेवीदाराच्या आणि कर्जदारांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी काही रोख स्वरुपात ही बँक जवळ ठेवते आणि उरलेली रक्कम मध्यवर्ती बँकेकडे ठेव स्वरुपात ठेवते.

३३) रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकावर वेगवेगळ्या ज्या जाचक अटी लादलेल्या आहेत. त्या अटी शिथिल कराव्यात. उदा·कर्ज देण्याचे बंधन, शाखा विस्ताराचे बंधन, ठेवी विमा योजनेची मर्यादा इत्यादी.

३४) खेळते भांडवल वाढविण्यासाठी इतर बँकाप्रमाणे या बँकेनेही कोणतीही योजना आखलेली नाही. कारण व्यवहाराच्या प्रमाणात त्यात आपोआप वाढ होत जाते.

३५) प्राथमिक शिक्षक बँकेचे कार्यक्षेत्र सांगली जिल्हा हे आहे. सध्या या बँकेच्या १४ शाखा आहेत व आणखी आठ शाखांची मागणी केली आहे. त्याही लवकरच पूर्ण होतील.

३६) बँकेच्या कर्जविषयक धोरणाचा व प्रगतींचा विचार करीत असताना असे दिसून आले की, कर्जविषयक धोरण बँकेच्या संचालकाकडून ठरविण्यात येते. पगार तारण व इतर किंमती वस्तू तारणावर रुपये १,००,०००/- लाख रुपये पर्यन्त कर्ज मिळते.

३७) संस्थेने मयत सभासद कल्याण ठेवीच्या व्याजातून मयत सभासदांची संस्थेकडे असणारी शिल्लक ही त्यांच्या कर्जातून जमा करुन राहिलेली, कर्ज बाकीस सूट दिली जाते. १९९४ मध्ये एकूण १० मयत सभासदांचे रुपये १,४०,६७७/ कर्जास सूट देण्यात आली आहे. तसेच सभासद मयत झाल्याचे समजताच ताबडतोब बँकेचा प्रतिनिधी त्यांचे घरी जाऊन कुटुंबियास रुपये १,०००/- मदत देण्यासंबंधी सध्याचे संचालक मंडळाने निर्णय घेतला असून त्याप्रमाणे कार्यवाही चालू आहे.

३८) या योजनेबरोबरच असाध्य आजार, अपघात ग्रस्त प्राथमिक शिक्षकांना प्रत्येकी रुपये १,०००/- मात्र मदत देण्याची योजना कार्यान्वित केली आहे. या तरतूदीसाठी शिक्षक सभासदांच्या सप्टेंबर महिन्याच्या पगारातून रुपये १०/- वर्गनी कापून घेतली जाते.

३९) सभासदांच्या हुशार मुलांना प्रोत्साहन मिळावे, त्यांचे गुणांचे कौतुक करावे व त्यांनी अधिक जोमाने अभ्यास करुन जीवनात यशस्वी व्हावे याकरिता सन १९७२ पासून एस.एस.सी. परीक्षेत गुणानुक्रमाने उत्तीर्ण झालेल्या १५० मुलांचा व एच.एस.सी. परीक्षेत गुणानुक्रमाने उत्तीर्ण झालेल्या ६० मुलांना पारितोषिक देऊन गौरव केला जातो. स्कॉलरशिप, शिष्यवृत्ती धारक, सैनिक स्कूल, पब्लीक स्कूल मध्ये प्रवेश घेतलेल्या मुलांचाही गौरव करुन पारितोषिक दिले जाते.

४०) आदर्श शिक्षकांचा सत्कार सन्मानपत्र देऊन केला जात आहे. १९९४ मध्ये जिल्ह्यातील १ राष्ट्रपती पुरस्कार, १ राज्य पुरस्कार, २१ जिल्हा पुरस्कार, २१ नगरपालिका शिक्षण मंडळ पुरस्कार, देऊन प्राथमिक शिक्षकांचा गौरव केला जात आहे.

४१) जे प्राथमिक शिक्षक पेन्शन मध्ये जातात व ते अशा प्राथमिक शिक्षकांना पेन्शन तारण पोटी रुपये १२,०००/- कर्ज पुरवठा केला जात आहे.

५) प्राथमिक शिक्षक बँकेने कर्ज देताना कर्जदाराचे उत्पन्न, कर्जासाठी ठेवलेले तारण, कर्ज काढण्याचा हेतू, कर्ज परतफेडीचा कालावधी दिलेले कर्ज, त्याच तारणासाठी वापरले जाईल की नाही या सर्व गोष्टींचा सखोल विचार करून संचालक मंडळाने कर्ज मंजूर करावे. तसेच कर्ज मंजूर करीत असताना व्यवस्थापक व जेष्ठ अधिकारी वर्ग यांचा सल्ला घ्यावा.

६) बँकेच्या कामकाजामध्ये सुधारणा करण्यासाठी बँकेने मुख्य कार्यालयास एक प्रशासक विभाग, दोन अकौंट विभाग, तीन कर्ज विभाग, व चार ठेवी विभाग, पाच तपासणी विभाग असे विभाग पाडून या प्रत्येक विभागास स्वतंत्र विभाग प्रमुख नेमून त्या त्या विभागाची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुखावर टाकून कामकाजाची रचना केल्यास बँकेचे कामकाज सुरळीतपणे व निर्दोष होईल.

७) रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे ही बँक स्वयंरोजगार, घरबांधणी, दुचाकी वाहन खरेदी या कारणासाठी कर्ज देऊन गुंतवणूक करते. शेती क्षेत्रासाठी ही बँक कर्ज देत नाही. गुंतवणूक करीत नाही. तरी शेती क्षेत्रासाठी सुध्दा या बँकेने कर्ज द्यावे.

८) प्राथमिक शिक्षक बँकेने अल्प, मध्यम मुदत कर्ज देण्याबरोबर दिर्घ मुदतीची कर्जे द्यावीत असे कर्ज देत असताना पगार तारण व इतर किंमती वस्तू तारण यावर भर द्यावा.

९) प्राथमिक शिक्षक बँकेने थकबाकीकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावे. वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब करून थकबाकी कमी करण्याचा प्रयत्न करावा.
उदा. कर्जदारांचे मेळावे आयोजित करावेत, त्यांना थकबाकीचे गांभीर्य पटवून द्यावे इत्यादी मार्गांचा अवलंब करूनही थकबाकी वसुल झाली नाही तर कायदेशीर मार्गाचा अवलंब करावा.

## उपाय योजना

१) देशाच्या एकूण प्रचंड उलाढालीमध्ये नागरी बँकांनी सामाजिक परिवर्तनाचे व समाजाचा आर्थिक स्तर उंचाविण्यासाठी जे कार्य केलेले आहे. त्याचा वाटा "खारी" एवढाच असेल परंतु देश विकासामध्ये निश्चित आहे. याचा विचार केला पाहिजे. कारण समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी भारतातील नागरी सहकारी बँकेच्या स्थापनेत जो असमतोल आहे, तो असमतोल दूर करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला पाहिजे.

२) भारतातील एकंदर नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीचा विचार करता असे दिसून आले आहे की, भारतात महाराष्ट्रातच अधिक बँका स्थापन झालेल्या आहेत. आणि जम्मू-काश्मिर, नागालॅण्ड, सिक्कीम, त्रिपुरा ही राज्ये व अंदमान निकोबार, लक्षद्विप, चंदीगड या ठिकाणी अजूनही नागरी सहकारी बँकांची सुरुवात झालेली नाही. त्यामुळे तो भाग मागे राहिला आहे. त्यासाठी त्या ठिकाणी सहकारी बँका स्थापन करण्याची गरज आहे. त्या साठी मोठा प्रयत्न केला पाहिजे.

३) प्राथमिक शिक्षक बँकेची जी सभासद संख्या आहे, ती बँकेच्या कार्यक्षेत्राच्या दृष्टीने पुरेशी आहे. प्राथमिक शिक्षक बँक ही लिमीटेड बँक आहे व जे प्राथमिक शिक्षक आहेत, अशा जवळजवळ सर्व शिक्षकांनी सभासदत्व स्विकारले आहे.

४) बँकेने ठेवी वाढविण्यावर अधिक भर द्यावा. त्यासाठी वेगवेगळ्या आकर्षक योजनांचा अवलंब करावा. त्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी. तसेच फिक्स डिपॉझिटचे प्रमाण जास्तीत जास्त वाढविण्याचा बँकेने अधिक प्रयत्न करावा.

१०) प्राथमिक शिक्षक बँकेचे सेवक वर्गात आणखीन वाढ करणे गरजेचे आहे. त्यासाठी सेवक वर्गाची संख्या आवश्यकतेइतकी वाढवावी. तसेच कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी वेगवेगळ्या प्रशिक्षण योजना बँकेने राबवाव्यात, मेळावे आयोजित करावेत. प्रत्येक वर्षी कमीत कमी चार कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणासाठी पाठवावे.

११) प्राथमिक शिक्षक बँकेच्या मुख्य कार्यालय सांगली व आटपाडी येथे लॉकर्सची सोय आहे. ही सोय बँकेच्या इतर शाखेमध्ये व्हावी.

१२) प्राथमिक शिक्षकाचा एखादा मुलगा (विद्यार्थी) जर परदेशी शिक्षणासाठी जाऊ इच्छित असेल तर आणि त्याला काही आर्थिक अडचण असेल तर ही अडचण दूर केली पाहिजे व ह्या मुलाला परदेशी जाण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

१३) बँकेने सभासदांच्या हिताची जोपासना केली आहे. बँकेच्या होणाऱ्या उत्पन्नातून सभासदांचा जास्तीत जास्त फायदा होतो. याऐवजी संस्था स्व-भांडवलावरती व भक्कम पायावरती उभारण्यासाठी संस्थेचे फंडस् वाढवि बाबत प्रयत्न केले पाहिजेत.

१४) प्राथमिक शिक्षक बँकेने नफ्यात आणखीन जास्तीत जास्त वाढ घडवून आणण्यासाठी थकबाकी कमी करण्याची व प्रशासकीय खर्चात काटकसर करण्याची गरज आहे. परिणामी नफ्यात वाढ घडून येईल.

१५) सभासदांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांचे उत्पन्न वाढविण्या साठी बँकेने वेळोवेळी आवश्यकतेनुसार कर्जपुरवठा करावा.

१६) बँकेने दिलेले कर्ज मुदतीत ज्या लोकांनी परत केलेले नाही, अशा सभासदांना बँकेचे कर्ज मुदतीत परत केल्याने जे फायदे होतात त्या फायद्याचे महत्व पटवून द्यावे.

१७) प्राथमिक शिक्षक बँकेने सभासदत्व देताना बँकेच्या कार्यक्षेत्रातील लोकांनाच द्यावे.

१८) बँकेने आपल्या विविध कार्याची माहिती सभासदांना करून देण्यासाठी जाहिराती, पोस्टर्स, प्रत्यक्ष संपर्क इत्यादी मार्गांचा अवलंब करावा. शाखांची संख्या वाढवून सर्वच सभासदांना इतर सेवा देण्याचा प्रयत्न करावा. तसेच वार्षिक सभेचे आयोजन सर्व साधारणपणे सुट्टीच्या दिवशी करावे, त्यामुळे अधिकाधिक सभासद सभेस उपस्थित राहण्यास मदत होईल व त्याच दिवशी लाभांशाचे वाटप करावे.

१९) बँकेने बँकिंग विषयक जागृकता निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत. यातूनच बचतीची सवय लागते. काटकसर करून पैसे शिल्लक टाकण्याचा प्रयत्न सभासदांकडून व्हावा, म्हणून उत्तेजनार्थ योजना राबवाव्यात.

२०) या प्राथमिक शिक्षक बँकेने सभासदांनी कर्ज घेतल्यानंतर सबसिडी योजना लागू केली पाहिजे.

२१) प्राथमिक शिक्षकांच्या हुशार व गरिब होतकरू मुलांना वसतीगृहाची सोय करावी. तसेच हुशार मुलांसाठी क्लासेस सुरू करावेत.

२२) अनावश्यक नोकर भरती टाळली पाहिजे. त्याचप्रमाणे प्रत्येक नवीन सभासदास ओळखपत्र अनिवार्य असले पाहिजे.

२३) या बँकेचा कारभार मोठा असल्याने या बँकेत संगणकाची सोय असायला हवी.

२४) कर्ज देताना कर्जाचे कारण पडताळून पहावे, लग्न, समारंभ, इत्यादीसाठी कर्ज देऊ नयेत. कारण यातून समाजाची आपोआप बचत होते आणि खर्चात काटकसर केली जाते.

२५) प्राथमिक शिक्षक बँकेने नोकर भरती करताना विशिष्ट उच्च पदवी घेतलेल्या लोकांनाच कामावर घ्यावे. नोकर भरती करीत असताना वशिला, पैसा, या माध्यमांचा वापर करू नये. कारण बँकेची आर्थिक स्थिती ही बँकेतील कर्मचा-यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते.

सारांश :-

सदर शोध निबंधावरून असे दिसून येते की, प्राथमिक शिक्षक बँक ही एक पगारदार नोकरदारांची एकमेव व कार्यक्षम अशी बँक आहे. या बँकेतील सर्व व्यवहार चांगल्या पध्दतीने चालतात. संचालक मंडळ पूर्ण वेळ देऊन बँकेची प्रगती करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

वेगवेगळ्या उद्योग व्यवसायांची उभारणी करण्यासाठी समाजातील लोकांना भांडवलाची नितांत गरज असते. या दृष्टीने बँकांनी कर्जपुरवठा करणे गरजेचे आहे. तसे जर झाले नाही तर उद्योजक वर्ग निर्माण होणार नाही व आर्थिक विकास होणार नाही. याच पध्दतीने बँकेनेही स्थापनेपासून जनतेच्या ठेवी गोळा करून गरजू सभासदांना वित्त पुरवठा केला आहे. आपणास असा निष्कर्ष काढता येईल की, तळागाळातील लोकांचा विकास व्हावयाचा असेल अशा प्रकारच्या आदर्श बँका समाजात स्थापन व्हावयाला पाहिजेत. आपला देश आर्थिक विकासाच्या मार्गावर असताना अशा प्रकारच्या कार्यक्षम कर्तव्यदक्ष बँकांची संख्या वाढली तर देशाचा आर्थिक विकास नियोजन वेळेपेक्षा लवकर साध्य होऊ शकेल.

थोडक्यात :-

बँका या एक प्रकारचा व्यवसाय करणा-या संस्था आहेत. समाजाच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याबरोबरच त्या निश्चितच देशाला पुढे नेतील. व आपला देश विकसित देशांच्या मालिकेत मोजला जाईल.